# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी

**प्रस्तावना :-**

**विषय :- वॉर्ड क्रं. २१ मधील वऱ्हाळदेवी मंगल भवन कार्यालय समोरील गुजराती वडापाव शेजारील रस्त्यापासुन ते मनपा शाळा क्रं. ३३ पर्यंत सी.सी. रस्ता तयार करणे.**

वॉर्ड क्रं. २१ मधील वऱ्हाळदेवी मंगल भवन कार्यालय समोरील गुजराती वडापाव शेजारील रस्त्यापासुन ते मनपा शाळा क्रं. ३३ पर्यंत सी.सी. रस्ता तयार करणे. याकामी "सिमेंट कॉंक्रिट रोड तयार करणे" या मनपा निधीच्या लेखाशिर्ष अंतर्गत एकुण १,४३,८५,५९९/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करुन सदर प्रस्ताव मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांचे प्रशासकीय मंजुरी करिता सादर करण्यांत आला असुन, सदर प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारसी प्रमाणे मा. प्रशासक तथा आयुक्त महोदय यांनी त्यास दिनांक २३/११/२०२३ रोजी मान्यता दिलेली आहे. सदर कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३(क) अन्वये प्रशासकीय ठराव करणेकामी मंजुरीस्तव सविनय सादर.

**ठराव क्रं. :-** 2ee **दिनांक :-** 30/99 /२०२३

वॉर्ड क्रं. २१ मधील वऱ्हाळदेवी मंगल भवन कार्यालय समोरील गुजराती वडापाव शेजारील रस्त्यापासुन ते मनपा शाळा क्रं. ३३ पर्यंत सी.सी. रस्ता तयार करणे. याकामी "सिमेंट कॉंक्रिट रोड तयार करणे" या मनपा निधीच्या लेखाशिर्ष अंतर्गत एकुण १,४३,८५,५९९/- इतक्या रक्कमेचे प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी शिफारस केलेली आहे. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, कडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)/नवि-१४, दिनांक ०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषःत कलम ४५२ अ (१अ)व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकरानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३(क) नुसार वरिल नमुद कामाच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका